# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक २०/०८/२०२६ (गुरूवार)**

.................................................................................................

## पोलीस स्टेशन अरोली अंतर्गत अवैध जुगार व्यवसायातील सराईत गुन्हेगार जितेंद्र उर्फ बाल्या श्रीराम खेरगड याला एमपीडीए कायदयाअंतर्गत केले स्थानबध्द

**पोलीस स्टेशन अरोली:—** पोलीस स्टेशन अरोली अंतर्गत अभिलेखावरील सराईत आरोपी नामे **जितेंद्र उर्फ बाल्या श्रीराम खेरगडे, वय ४९ वर्ष, रा. निमखेडा, ता. मौदा, पो.स्टे. अरोली, जिल्हा नागपूर** याचे विरूध्द अवैध जुगाराचे **११ गुन्हे** नोंद आहे. नमुद आरोपीने परिसरात अवैध जुगार अड्डे सुरू केले होते. नमुद आरोपी हा असे गुन्हे करण्याच्या सवयीचा आहे. त्यांच्या गुन्हेगारी कृत्यांमुळे असामाजिक प्रवृत्तीला चालना मिळत होती तसेच नागरिकांमध्ये असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले होते. पोलीसांनी त्यांचेविरूध्द वेळोवेळी कारवाई करून गुन्हे नोंद केले तसेच त्यांचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता वेळोवेळी त्यांचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली. परंतु आरोपी **जितेंद्र उर्फ बाल्या श्रीराम खेरगडे** याने आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली.

**आरोपींचे कृत्य समाजिक सुव्यवस्थेला बाधक ठरत असल्याने तसेच नमुद आरोपी समाजासाठी धोकादायक ठरत असल्याने मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री रमेश बरकते ,उपविभागिय पोलीस अधिकारी,रामटेक यांच्या मार्गदर्शनाखाली आरोली पोलीसांकडुन एमपीडीए कायदयान्वये कारवाई करण्यात आली. मा. जिल्हाधिकारी ,नागपुर यांनी १९/०८/२०२६ रोजी सराईत गुन्हेगार जितेंद्र उर्फ बाल्या श्रीराम खेरगडे, वय ४९ वर्ष, रा. निमखेडा, ता. मौदा, पो.स्टे. अरोली, जिल्हा नागपूर याचे विरूध्द स्थानबध्दतेचा आदेश काढला असता अरोली पोलीसांनी तात्काळ आरोपीचा शोध घेवुन त्याला तात्काळ ताब्यात घेवुन दिनांक २०/०८/२०२६ रोजी मध्यवर्ती कारागृह भंडारा येथे स्थानबध्द करण्यात आले आहे.**



**जितेंद्र उर्फ बाल्या श्रीराम खेरगडे**

## ६ तासात जबरी चोरीचा गुन्हा उघड, ३ आरोपीतांना अटक
## ०१ लाख ९० हजार रूपयाचा मुद्देमाल जप्त
## बेला पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन बेला** :— मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा ,श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री मयंक माधव, सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, उमरेड उपविभाग ( प्रभार नागपुर उपविभाग) यांच्या मार्गदर्शनात बेला पोलीसांनी अवघ्या ६ तासाच्या आत जबरी चोरीचा गुन्हा उघड करून ३ आरोपींना अटक केली आहे.

पोलीस स्टेशन बेला अंतर्गत फिर्यादी नामे रमाशंकर कैलास राज्यभर, वय ५४ वर्ष, रा. चंद्रपूरयांनी तक्रार दिली की, दिनांक १९/०८/२०२६ रोजी फिर्यादी हा त्याचे ट्रक मध्ये व त्याच्यासोबत असलेला सुभाष यादव हा दुसऱ्या ट्रकमध्ये येकोणा माईन्स वरोरा

येथून कोळसा लादून बेला येथील आयडियल पावर प्लांट मध्ये येत असता सोनेगाव टी पॉईंट येथे भूक लागल्याने रोडचे कडेला त्यांची वाहने पार्क करून फिर्यादीच्या ट्रकमध्ये बसून जेवण केले व ट्रकच्या बाहेर येऊन हात धूत असताना दोन मोटरसायकल वर आलेल्या तीन अनोळखी इसमांनी फिर्यादीला हाता बुक्क्यांनी मारहाण करून त्याचे खिशातील नगदी ५०००/– रुपये, ०१ एम आय कंपनीचा मोबाईल असा एकूण २०,०००/–रुपयाचा मुद्देमाल जबरीने खिशातून काढून चोरून नेला. अशा फिर्यादीचे तोंडी रीपोर्ट वरुन पो.स्टे. बेला येथे अपराध क्रमांक ३०७/२६ कलम ३०९(६), ३(५), भान्यासं गुन्हा नोंद आहे.

बेला पोलीस स्टेशन येथील तपास पथकाने सदर गुन्हयांचा तपास करीत असतांना सायबर पोलीस स्टेशन, नागपूर ग्रामीण यांच्या सहकार्याने तांत्रिक विश्लेषण, तसेच गोपनीय माहितीच्या आधारे तपास करून सदर गुन्हयातील अज्ञात आरोपीचा कसोशीने शोध घेवुन **आरोपी नामे १) राहुल राजू तिवारी, रा. आसोली सावंगा २) योगेश उद्देश राऊत, रा. खडकी तालुका सेलू जिल्हा वर्धा ३) सुरज कृष्णाजी ठाकरे, रा. आसोली सावंगा** यांना आसोला सांवगी येथुन ताब्यात घेवुन अटक करण्यात आली आहे. नमुद आरोपी यांच्याकडे कौशल्यपुर्ण विचारपुस केली असता त्यांनी पोलीस स्टेशन बेला परिसरात गुन्हा केल्याचे सांगितले. **पंचासमक्ष आरोपींच्या ताब्यातुन गुन्हयातील चोरलेला मोबाईल किंमती १५,०००/– रूपये व रोख रक्कम ५०००/–रूपये, दोन मोबाईल किंमती ४०,०००/–रुपये, आरोपीने गुन्ह्यात वापरलेली होंडा शाईन मोटरसायकल किंमती ५०,०००/– रुपये आणि बजाज पल्सर मोटरसायकल किंमती ८०,०००/–रूपये असा एकूण १,९०,०००/–रूपयाचा मुद्द्देमाल जप्त करण्यात आला आहे.**




## सावनेर पोलीस स्टेशन हद्दीतील ०३ सराईत गुन्हेगारांना नागपुर जिल्हयातुन केले हद्दपार

पोलीस स्टेशन सावनेर हद्दीतील सराईत आरोपी **१) गणेश देवाजी झोडापे, वय ४५ वर्ष, रा. वार्ड नं. ३, मौनीबाबा झोपडपट्टी गुजरखेडी सावनेर, ता. सावनेर, जि. नागपूर २) सुनिल मणि मडावी, वय ४७ वर्ष, रा. वार्ड नं. १, पाटणसावंगी, ता. सावनेर, जि. नागपूर ३) अजय मुरलीधर भगत, वय ४२ वर्ष, रा. वार्ड नं. ६१, डहाके ले आउट, आरती टाउन मागे गोधनी रेल्वे नागपूर** यांना महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) अन्वये हद्दपार करण्यात आले आहे.

**वर नमुद सराईत गुन्हेगार क्र १) याचेवर अवैध दारू विक्री करणे, जुगार खेळणे, लोकांना अश्लील शिवीगाळ करून मारपीट करणे, जिवाने मारण्याची धमकी देणे, यासारखे गुन्हे नोंद आहे. तसेच सराईत गुन्हेगार क्र २) याचेवर अवैध दारू विक्री व जुगार बाबत गुन्हे नोंद आहेत. सराईत गुन्हेगार क्र. ३) याचेवर शरीराविरूद्ध गुन्हे, जिवाने मारण्याचा प्रयत्न करणे तसेच सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था भंग करणे, फौजदारी पात्र यासारखे गुन्हे नोंद**

**आहेत.** नमुद आरोपींचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता पोलीसांनी वेळोवेळी त्यांचे वर कारवाई करून गुन्हे नोंद केले तसेच त्यांचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपी यांनी आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. आरोपींच्या गुन्हेगारी कृत्यामुळे परीसरातील अनेकांना दारूचे व्यसन जडले आहे. तसेच त्यांच्या कृत्यामुळे शांततेचा भंग होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता असल्यामुळे नमुद तिनही आरोपींचा महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) अन्वये हद्दपार करण्याचा प्रस्ताव सावनेर पोलीसांनी उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर यांच्या मार्फतीने उपविभागिय दंडाधिकारी, सावनेर यांचे कडे पाठविला असता त्यांनी प्रस्ताव मंजुर करून वर नमुद आरोपी १) ते ३) यांना **१ महीन्यांकरीता** नागपुर जिल्हयातुन हद्दपार केले आहे.

**नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांतर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, नमुद आरोपी हे नागपुर ग्रामीण व नागपुर जिल्हा हद्दीत दिसुन आल्यास नजिकच्या पोलीस स्टेशनला तात्काळ माहीती द्यावी.**



गणेश देवाजी झोडापे



सुनिल मणि मडावी



अजय मुरलीधर भगत

# नरखेड पोलीस स्टेशन हद्दीतील अवैध दारू व्यवसायात सराईत गुन्हेगारास नागपुर जिल्हयातुन केले हद्दपार

पोलीस स्टेशन नरखेड हद्दीतील सराईत आरोपी सुमित बंडुजी बिसांद्रे, वय २८ वर्षे, रा. सिंगारखेडा, तह. नरखेड याला महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) अन्वये हद्दपार करण्यात आले आहे.

**वर नमुद सराईत गुन्हेगार सुमित बंडुजी बिसांद्रे, वय २८ वर्षे, रा. सिंगारखेडा, तह. नरखेड याचेवर अवैध दारू विक्री बाबत गुन्हे नोंद आहे.** नमुद आरोपीचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता पोलीसांनी वेळोवेळी त्याचेवर कारवाई करून गुन्हे नोंद केले तसेच प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपीने आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. आरोपींच्या गुन्हेगारी कृत्यामुळे शांततेचा भंग होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता असल्यामुळे नमुद आरोपींचा महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) अन्वये हद्दपार करण्याचा प्रस्ताव नरखेड पोलीसांनी उपविभागिय पोलीस अधिकारी, काटोल यांच्या मार्फतीने उपविभागिय दंडाधिकारी, काटोल यांचे कडे पाठविला असता त्यांनी प्रस्ताव मंजुर करून वर नमुद **आरोपी सुमित बंडुजी बिसांद्रे, वय २८ वर्षे, रा. सिंगारखेडा, तह. नरखेड** याला **२ महीन्यांकरीता** नागपुर जिल्हयातुन हद्दपार केले आहे.

**नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांतर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, नमुद आरोपी हा नागपुर ग्रामीण व नागपुर जिल्हा हद्दीत दिसुन आल्यास नजिकच्या पोलीस स्टेशनला तात्काळ माहीती द्यावी.**



**सुमित बंडुजी बिसांद्र**

## दारूच्या नशेत भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने वाहन चालवुन करणाऱ्या आरोपी विरूध्द सदोष मनुष्यवधचा गुन्हा नोंद आरोपी अटक

**पोलीस स्टेशन पारशिवनी :—** दिनांक २०/०८/२०२६ रोजी पारशिवनी पोलीस स्टेशन येथे फिर्यादी हगरुलाल बुद्धुलाल चौधरी, वय ६५ वर्षे, रा. सकरला वार्ड नंबर ३, तह. पारशिवनी यांनी फिर्याद दिली की, दिनांक १९/०८/२०२६ रोजी मौजा सावळी शिवार डाखोरे यांचे शेतासमोर हायवे रोडवर सावनेर कडुन पारशिवनी कडे जाणाऱ्या कार क्र. एम. एच—४०/सी.एम. ०९७४ च्या चालकाने याने दारू पिवुन दारूचे नशेत त्याचे ताब्यात असलेले वाहन निष्काळजीपणे, भरधाव वेगाने व बेदरकारपणे चालवुन यातील मृतक नामे अमित चौधरी यांचे मोटरसायकलला मागून जोरदार धडक मारल्याने मोटरसायकल चालक मृतक हा जागेवर मरण पावला. तसेच मोटर सायकल वर मागे बसलेला मृतकाचा मुलगा संगम अमित चौधरी हा जखमी झाला. कार चालकाने अपघात करून सहकार्य न करता कारसह अपघात स्थळावरून पळुन गेला. सदर प्रकरणी पोलीस स्टेशन पारशिवनी येथे आरोपी कार चालक नामे फिरोज ऊर्फ छोटू बब्बू शेख, वय ३७ वर्षे, रा. निंबा, ता. पारशिवाणी याचेविरूद्ध कलम २८१, १०५, १०६(१), १२५(बी) भान्यासं सहकलम १८४, १३४/१७७ मोटर वाहन कायदा अन्वये गुन्हा नोंद केला होता.

**आरोपी कार क्र. एम. एच–४०/सी.एम. ०९७४ चा चालक फिरोज ऊर्फ छोटू बब्बू शेख, वय ३७ वर्षे, राह. निंबा, ता. पारशिवाणी याला दारूच्या नशेत वाहन चालविल्याने अपघात होवुन मृत्यु होवु शकतो हे माहीती असतांना सुद्धा त्याने त्याच्या ताब्यातील वाहन दारूच्या नशेत भरधाव वेगाने, निष्काळजीपणाने चालविल्याने सदर अपघात होवुन मोटरसायकल चालक मरण पावला. आरोपींस अटक करण्यात आलेली आहे.**

## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या ०७ आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद, रोख रक्कम व दुचाकी वाहने, मोबाईलसह ०२ लाख ४२ हजार ९५० रूपयांचा मुद्देमाल जप्त,सावनेर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन सावनेर** :– दिनांक १९/०८/२०२६ रोजी सावनेर पोलीसांना गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, पोलीस ठाणे सावनेर हद्दीतील मौजा बोरूजवाडा येथील न्यु फ्रेंड्स कॉलनी येथे काही इसम गजानन मंदीर जवळील एका घरामध्ये काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी पोहचले असता, नमुद घटनास्थळी काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना दिसुन आले. पोलीसांनी **आरोपी नामे १) राहुल विनोद धोंगडे, वय २३ वर्ष, रा. वार्ड क्र. ११, बाजार चौक सावनेर २) भास्कर सदाशिव धोटे, वय २८ वर्ष, रा. वार्ड क्र. ४, गजानन मंगल कार्यालय केळवद, ता. सावनेर ३) पिंटु नत्थुजी ढवळे, वय ४५ वर्ष, रा. वार्ड क्र. १२, ढिवरपुरा सावनेर ४) अमित शंकर मौदे, वय ३२ वर्ष, रा. न्यु फ्रेंड्स कॉलनी बोरूजवाडा सावनेर ५) राहुल पांडुरंग देशमुख, वय ३७ वर्ष, रा. वार्ड क्र. ७, सावनेर** यांना ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना जागीच पकडले. **तसेच ६) साहील शेंडे, वय २५ वर्ष, रा. पंचशिल नगर सावनेर ७) अरशद शेख, वय २८ वर्ष, रा. मुरलीधर मंदीर सावनेर** हे सुध्दा घटनास्थळावर ५२ तासपत्ते खेळत असल्याची माहीती पोलीसांना प्राप्त झाली. पोलीसांनी घटनास्थळावरून ५२ तासपत्ते आणि रोख रक्कम १,३२,७५०/–रूपये, ०३ मोटरसायकल, ०२ अँड्रॉइड मोबाईल, इतर साहित्य असा एकूण २,४२,९५०/–रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**नमुद ०७ आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन सावनेर येथे कलम ४, ५ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**



**अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या आरोपीतांविरूध्द ०२ गुन्हे नोंद, रोख रक्कम व दुचाकी वाहनासह ४२ हजार २६० रूपयांचा मुद्देमाल जप्त,नरखेड पोलीसांची कामगिरी**

**पोलीस स्टेशन नरखेड** :— दिनांक १८/०८/२०२६ रोजी नरखेड पोलीसांना गोपनीय माहितीवरून ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या इसमांवर कारवाई करत दोन गुन्हे नोंद केले आहे. दोन्ही कारवाई मध्ये एकुण ४२,२६०/—रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.

पोलीस ठाणे नरखेड हद्दीतील मौजा सावरगाव शिवार येथे सार्वजनिक ठिकाणी **आरोपी नामे १) श्रेयस अनिल पाटील, वय २३ वर्ष, २) जितेंद्र मारोतराव सरवरे, वय २३ वर्ष, ३) विशाल उर्फ सोनु जीवन छनीया, वय ३३ वर्ष ४) सोहेल इस्माईल शेख, वय ३३ वर्ष ५) सरफराज युसुफ शेख, वय ३४ वर्ष ६) रेहान बशीर जुम्मा शेख, वय २१ वर्ष,**

**सर्व रा. सावरगाव, त. नरखेड जि. नागपुर** यांना ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना जागीच पकडले. पोलीसांनी घटनास्थळावरून ५२ तासपत्ते आणि रोख रक्कम ५९००/—रूपये, ०१ मोटरसायकल असा एकूण ३५,९३०/—रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस ठाणे नरखेड हद्दीतील मौजा सावरगाव शिवार येथे सार्वजनिक ठिकाणी आरोपी नामे **१) शेख मेहमुद इलाही, वय ४३ वर्ष २) अयाज शफी शेख, वय ३६ वर्ष ३) संदिप उर्फ संजय बाबुराव ठोंबरे, वय ३४ वर्ष ४) वैभव लक्ष्मण बावणे, वय १९ वर्ष ५) करन बाबुलाल मोहनकर, वय २२ वर्ष, सर्व रा. सावरगाव, त. नरखेड** यांना ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना जागीच पकडले. **६) मोंटु दिपक बागडे, रा. मन्नथखेडी ता. नरखेड** हा घटनास्थळावरून पळुन गेला. पोलीसांनी घटनास्थळावरून ५२ तासपत्ते आणि रोख रक्कम ६३००/—रूपये, इतर साहित्य असा एकूण ६,३३०/—रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**दोन्ही कारवाई मध्ये एकुण ४२,२६०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. नमुद आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन नरखेड येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये दोन गुन्हे नोंद करण्यात आला आहे.**

## नागपूर ग्रामीण पोलिसांनी राबवली अवैध दारूविरोधात विशेष मोहीम
## दारूबंदी कायद्यान्वये २६ गुन्हे दाखल
## १ लाख ७४ हजार ३९० रूपयांचा मुद्देमाल जप्त

**दिनांक १९/०८/२०२६ रोजी मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली नागपूर ग्रामीण पोलिसांकडून अवैध दारूविक्री, दारूची साठवणूक विशेष जनजागृती व अंमलबजावणी मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेदरम्यान नागपूर ग्रामीण जिल्ह्यात दारूबंदी कायद्यान्वये एकूण २६ गुन्हे दाखल करण्यात आले.**

**पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी** येथे १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन बोरी येथे** २ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन कोंढाळी** येथे १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन** काटोल **येथे** ०४ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन नरखेड येथे** ०३ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन रामटेक येथे** २ गुन्हे नोंद.

**पोलीस स्टेशन देवलापार येथे** १ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन कन्हान येथे** १ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन वडोदा येथे** १ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन वेलतूर येथे** १ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन भिवापूर येथे** १ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन सावनेर येथे** ०५ गुन्हे नोंद. **पोलीस स्टेशन खापा येथे** ३ गुन्हे नोंद.

**नमुद कारवाईत एकुण १२२६० मिली देशी दारू, १८० लिटर मोहाफुल दारू, १६०० लिटर मोहाफुल सडवा, वाहन, इतर साहित्य असा एकुण १,७४,३९०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

मा. पोलीस अधीक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने